# वसई - विरार शहर महानगरपालिका

## कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कार्यालय

## प्रभाग समिती 'सी' सविस्तर निविदा सुचना

वसई - विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यक्षेत्रातील विकास काम करण्यासाठी शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून बी - १ नमुन्यात द्विलखोटा पध्दतीनुसार महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहून मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म दि. 16/03/2022 ते दि. 22/03/2022 रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत सुट्टीचे दिवसाखेरीज महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यालयात बांधकाम विभागाकडे कार्यालयीन कामकाजाचे वेळेत रोखीने विकत मिळतील. सदर कामांची इसारा रक्कम आयुक्त, वसई विरार महानगरपालिका या नावे व मा.आयुक्त देय असलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे भरावी लागेल व सदर डिमांड ड्राफ्ट निविदासोबत जोडावा लागेल. डिमांड ड्राफ्टद्वारे इसारा न भरलेल्या, खाडाखोड केलेल्या, मुदतीत न आलेल्या व सशर्त निविदा नाकारण्यात येतील. सदर कामी पुर्णपणे भरलेल्या मोहरबंद निविदा दि. 23/03/2022 रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यालयातील बांधकाम विभागाकडे सिलबंद निविदा पेटीत टाकण्यात याव्यात. प्राप्त निविदा प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यालयात निविदा समिती समोर हजर निविदा धारक अथवा त्याचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष त्याच दिवशी सायं.४.०० वा. प्रथम तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र.१ उघडण्यात येईल. लिफाफा क्र.१ मध्ये सविस्तर निविदा सुचनेमध्ये दर्शविल्यानुसार कागदपत्रे असल्यास वित्तीय बोलीचा लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल. याकामी आलेल्या निविदांपैकी कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे. त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी | सुरक्षा अनामत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विरार (पू.) प्रभाग क्र.१२ मध्ये उर्दू शाळेच्या शेजारी समाजमंदीसाठी शेडचे बांधकाम करणे. | २९४८२०/- | २९४८ | रु.२००/-<br>(अधिक १२% GST) | २% डी. डी. ने व<br>२ % बिलातून | ३० दिवस |

**अटी व शर्ती :**

टिप -

१] ठेकेदारांनी निविदा भरताना दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करावा तसेच लिफाफा क्र.१ मध्ये खालील कागदपंत्राचा समावेश असणे आवश्यक आहे.

१] सार्वजनिक बांधकाम विभागाच्या योग्य वर्गातील नोंदणी प्रमाणपत्राची छांयाकित प्रत.

Scanned with CamScanner

२] G. S. T. नोंदणी प्रमाणपत्र

३] रु.१००/- स्टॅम्पपेरवर प्रतिज्ञापत्र.

४] महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे शासन क्र.सीएसटी/२०१८/प्र.क्र.१२७/इमा-२ दि.२८ नोव्हेंबर २०१८ अन्वयेच्या विहीत नमुन्यातील परिशिष्ट-१ नुसार यापुढे ३.०० लक्ष आतील स्थानिक व ३.०० वरील किमतीच्या ई -निविदेसोबत जोडलेली (अपलोड केलेली) सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-१) ५००/- रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर लिफाफा क्र.०१ मध्ये कंत्राटदारास बंधनकारक करण्यात येत आहे. व निविदेतील लिफाफा क्र.०१ मध्ये तसेच निविदा मंजूरी व नंतर देयक अदा करताना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निविदा उघडल्यानंतर निदर्शनास आल्यास त्यास कंत्राटदार पूर्णपणे जबाबदार राहील. सार्वजनिक बांधकामाचे अधिकारी त्यास जबाबदार असणार नाहीत.

५] महानगरपालिकेकडून देयकाचे प्रदान अपेक्षित असलेल्या बँक खाते क्रमांकाची बँकेच्या नावासह यादी असणारे विवरणपत्र किंवा बँक खाते पुस्तकाच्या वरील पृष्ठाची छायांकित प्रत.

सदरची कागदपत्रे लिफाफा क्र.१ मध्ये नसतील तर निविदा बोलीचा लिफाफा क्र.२ उघडला जाणार नाही.

२] सदर कामाबाबत निविदाधारकाकडून तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास फेर निविदा मागविण्यात येतील. तसेच कोणत्याही कारणाशिवाय निविदा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे व त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

३] निविदा प्रणाली बाबत काही शंका असल्यास अधिक माहितीसाठी महापालिकेच्या प्रभाग समिती (सी) बांधकाम विभागाकडे संपर्क साधावा.

४] इतर सविस्तर अटी-शर्ती निविदा फॉर्ममध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

५] प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा कमी दराचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किंमतीच्या १% एवढा रक्कमेचा धनाकर्ष (Demand Draft) परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून निविदेच्या लिफाफा क्र.२ मध्ये सादर करावा. (उदा. १% ते १०% कमी दर - १% रक्कम).

प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% जास्त दराने कमी असेल तर देकार १०% पेक्षा जेवढ्या जास्त दराने कमी आहे तेवढ्या रकमेचा वरील प्रमाणे येणाऱ्या रकमेसह एकत्रित धनाकर्ष (Demand Draft) निविदेसोबत लिफाफा क्र. २ मध्ये सादर करावा. (उदा. १४% कमी दर - १०% पर्यंत करिता - १% व (१४% - १०%) - ४%) असे एकूण ५%

६] धनाकर्ष उपलब्ध करून देणे / धनाकर्ष परत करणे व इतर बाबींबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

A. धनाकर्ष आयुकत, वसई - विरार शहर महानगरपालिका च्या नावे असावा.

B. धनाकर्ष सरकारी बँक किंवा शेड्युल्ड बँकांकडून काढलेला असावा.

C. धनाकर्षाची मुदत निविदा भरण्याच्या दिनांकानंतर किमान ३ महिने पर्यंत असावी.

D. धनादेश सिलबंद लिफाफ्यामधून कंत्राटदाराने निविदा स्विकृतीच्या दिनांकास सहा. अभियंता यांचे कार्यालयात जमा करावा.

Scanned with CamScanner

E. लिफाफ्यावर कामाचे नाव व निविदा सुचना क्रमांक लिहीण्यात यावा.

F. धनाकर्षावर बँकेचा MICR व IFSC कोड नंबर असणे आवश्यक आहे.

G. वरील पद्धतीमध्ये खोटी कागदपत्रे / धनाकर्ष सादर करणाऱ्या कंत्राटदारांची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल व संबधित ठेकेदारांची नोंदणी १ वर्षासाठी स्थगीत ठेवण्यात येईल. यासाठी अति. आयुकत /

७] निविदाकारांकडून प्राप्त धनाकर्ष वटविल्यानंतर कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

८] सविस्तर निविदा सुचना बांधकाम विभाग, प्रभाग समिती 'सी' चंदनसार, वसई विरार शहर महानगरपालिका कार्यालयात पाहावयास मिळेल.

९] निविदा फॉर्म फी वरील गुड्स ॲण्ड सर्विस टॅक्स [GST] बाबत शासनाकडून दिलेल्या नियमानूसार गुड्स ॲण्ड सर्विस टॅक्स [GST] महानगरपालिकेत रोखीने भरणा करुन घेण्यात येईल.

१०] सविस्तर निविदा सुचना / अटी कोऱ्या निविदामध्ये जोडण्यात आली आहे.

जा.क्र.- व.वि.श.म./बांध./ ३७० /२१
दिनांक :- २५/०३/२०२१

अति. आयुक्त
वसई - विरार शहर महानगरपालिका